# My Grandmother Essay In Marathi In 500 Words

## आजीचे वय आणि आनंदी स्वभाव

माझी आजी ही ७५ वर्षाची आहे. ती कायम आनंदात आणि हसत खेळत राहते. माझी आजी ही कुटुंब प्रमुख आणि महत्वाची सदस्य आहे. घरात आजीचा खूप आदर करतात. आम्हा सर्वांना आजी सकाळी लवकर उठवते आणि शाळेसाठी तयार करते. आमच्या दुपारच्या जेवणाचा डब्बा सुद्धा बनवून ठेवते. आम्हाला शाळेत सोडल्यानंतर ती घरातली इतर कामे करण्यात व्यस्त होते. जस की साफ सफाई, जेवण आणि इतर कामे ती करते. आमचे घर फार जुने आहे परंतु तिने ते आजही नव्या सारखे राखले आहे.

## कुटुंबात आजीची महत्त्वाची भूमिका

बाबांची आई असो किंवा आई ची आई, दोनीही आजीही आम्हा मुलांवर तितकच प्रेम आणि लाड करतात. आम्ही शाळेतून घरी आल्यावर आजी आमच्या सोबत वेळ घालवते. आम्हाला संध्याकाळी बागेत चालायला किंवा खेळायला घेऊन जाते. घरी आल्यावर ती संध्याकाळी पुन्हा रात्रीच्या स्वयंपाका ला लागते. थोडा वेळ काढून आमचा अभ्यास घेते, गृहपाठात पण मदत करते. लहापणापासूनच आम्ही तिच्या सहवासात राहिल्यामुळे तिचा आमच्या मुलांवर खूप जीव आहे.

## आजीचा हसमुख स्वभाव आणि मदतीचा हात

तिझ्या हसमुख स्वभावामुळे तिला आजूबाजूचे लोक सुद्धा ओळखतात. घरातच नव्हे, बाहेर सुद्धा कोणी जर अडचणीत असेल तर ती नेहमी मदतीचा हाथ पुढे करते. ती एवढे वय असूनही चपळ आहे. घर काम असो, चालायला जाणे किंवा आमच्या सोबत वेळ घालवणे असो यात ती कधीच आळशीपणा करत नाही. नेहमी उत्साही राहून काम करते. माझी आजी खूप छान जेवण बनवते. त्यातल्या त्यात ती पुरणपोळी खूप चवीष्ट बनवते. आम्हा सर्वांना आजीच्या हातचे जेवण फार आवडते. कोणी उपाशी तर राहत नाही ना याची काळजी घेते. बाबा संध्याकाळी कामावरून उशिरा ये पर्यंत आजी जागी असते.

## शाळेतील कार्यक्रमांमध्ये आजीची उपस्थिती

शाळेत जर काही कार्यक्रम असेल जसं संमेलन किंवा पालक-सभा यात आजी नेहमी हजर असते. शाळेतल्या शिक्षकांशी आमच्या अभ्यसाबद्दल नियमित चौकशी करते. जर आमची शाळेची सहल जाणार असेल आणि बाबांचा नकार असेल तेव्हा आम्ही भावंडं आजी ला मनवात असू आणि नेहमी प्रमाणे आम्हाला सहली साठी आजीमुळे परवानगी मिळत असे. आम्ही आनंदाने सहलीला जात असायचो. आमच्या पाठीशी आजी नेहमी उभी असते. आम्ही सर्व नशीबवान आहोत कि आम्हाला अशी प्रेमळ, समजुदार आणि शीस्तबद्ध आजी भेटली आहे.

## रविवारी आजीसोबत घालवणे

रविवारच्या सुट्टीला आम्ही सकाळी लवकर उठून आजी सोबत बाहेर चालायला जातो. घरातील मोठे निर्णय बाबा आणि काका आजही आजीला विचारून घेतात. मग ते पारिवारिक असो किंवा आर्थिक असो. घरातील समस्या आम्हा मुलांपर्यंत येऊ नये याची काळजी घेते. रोज रात्री आम्ही भावंडं झोपायन्या आधी आजी आम्हाला छान छान गोष्टी सांगत. तिच्या गोष्टीत नेहमी शिकवण असे. कधी कधी ती तिच्या लहानपणीच्या आठवणी आमहाला सांगायची.

## आजीची कडक शिस्त आणि शिकवण

आजी जितकी प्रेमळ आहे तितकीच ती कडक शिस्तीची पण आहे. सकाळी लवकर उठणे, निरोगी राहणे,

सर्वांचा आदर करणे, एकत्र राहणे या सारख्या गोष्टी आम्हाला आजीनेच शिकवल्या. नियमित अभ्यास करणे आणि जेवल्यानंतर आपापले ताठ उचलून किचन वर ठेवणे या सारख्या छोट्या छोट्या गोष्टी तिने आम्हाला शिकवल्या. आजी समानतेने सर्वांना वागवते. आजी जुन्या विचारांची असल्यामुळे ती सर्वे सण खूप छान साजरे करते आणि आम्हाला तसं शिकवते. ती फोन नाही वापरत पण सर्वांचे नंबर तिझ्या तोंड पाठ आहेत.

## सारांश

खरंच आजी असणे हे खूप भाग्यवान असते. या निबंधाचा तात्पर्य आहे की, आपल्या आजी-आजोबांचा आदर करावा आणि त्यांचं महत्व ओळखावं. ते आपल्या कुटुंबाचे आधारस्तंभ असतात आणि त्यांच्या अनुभवांमुळे आपण खूप काही शिकत असतो. आजीने आपल्याला शिस्त, प्रेम, आणि एकत्र राहण्याचे महत्त्व शिकवले आहे. त्यांच्या सहवासात राहून आपण कसे वागावे, एकमेकांची कशी काळजी घ्यावी हे शिकतो. त्यामुळे त्यांचा नेहमी आदर द्यावा आणि त्यांचं सान्निध्य हे आनंदाने आपण सर्वांनी अनुभवावं.